पुढारी कोल्हापूर, बुधवार, ७ जानेवारी २०२६

# ऋषीकेश, शर्वरी कबनूरकर, अंशुमन शेवडे यांचे यश

## बेळगाव येथील आंतरराष्ट्रीय फिडे बुद्धिबळ स्पर्धा




ऋषीकेश कबनूरकर शर्वरी कबनूरकर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



अशुमन शेवडे

बेळगाव येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषीकेश कबनूरकर याने ९ व्या फेरीत ७ गुण मिळवून पहिला क्रमांक घेत १३,००० रुपये आणि २३ फिडे गुणांची कमाई केली. शर्वरी कबनूरकर हिला ६.५ गुण मिळवून ३ रा क्रमांक मिळाला. तिला ५,००० रुपये पारितोषिक आणि २० फिडेल रेटिंग देऊन गौरव करण्यात आला. अशुमन शेवडेने ६ गुण मिळवून अंडर १६ गटात ३,००० रुपयांचे पारितोषिक मिळवले आणि आपल्या फिडे १२० गुणांची कमाई केली.

रोटरी चषक बुद्धिबळ स्पर्धा २०२६ आणि बेळगाव जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या सहकार्याने महावीर भवन येथे ही स्पर्धा झाली. स्पर्धेसाठी एकूण ५ लाख रुपयांची पारितोषिके होती. यात देशातील ३५६ खेळाडूंनी भाग घेतला. यात १८४ फिडे मानांकित खेळाडूंचा समावेश होता. ऋषीकेश, शर्वरी व अंशुमन हे अनुज ॲकॅडमी दाभोळकर कॉर्नर, ताराबाई पार्क येथे सराव करतात. ते स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे विद्यार्थी असून, त्यांना कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभागप्रमुख प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, कोल्हापूर जिल्हा बुद्धिबळ असोसिएशनचे माजी सचिव कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

कोल्हापूर, बुधवार, ७ जानेवारी २०२६

# साठे, गवळी यांचे राज्यसेवा परीक्षेत यश



गीतांजली साठे



सीमा गवळी

कोल्हापूर, ता. ६ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेतलेल्या राज्यसेवा परीक्षेत मल्हारपेठ (ता. पन्हाळा) येथील गीतांजली गोपाळ साठे व वसगडेमधील (ता. करवीर) सीमा शांतिनाथ गवळी यांनी यश मिळविले. साठे यांनी राजपत्रित वर्ग-एकच्या पदाला गवसणी घातली असून, त्यांची उद्योग उपसंचालकपदी, तर गवळी यांची गटविकास अधिकारीपदी निवड झाली आहे.

साठे यांचे प्राथमिक शिक्षण तारळे (ता. पाटण, जि. सातारा) येथे, तर महाविद्यालयीन कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयातून झाले. कराडमधील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरची पदवी मिळविल्यानंतर विद्या प्रबोधिनी ॲकॅडमीत स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला. त्या पहिल्या प्रयत्नात मोटर वाहन निरीक्षक पदाची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्यानंतर विक्रीकर निरीक्षक, अन्न औषध प्रशासन, करनिर्धारण, प्रशासकीय अधिकारी गट अ नगरपरिषद परीक्षेतही त्यांनी यशाचा झेंडा रोवला. सध्या त्या ठाणे येथे विक्रीकर निरीक्षक पदावर कार्यरत आहेत. त्यांचे पती राहुल आपटे मुंबई येथे पोलिस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असून, त्यांना वडील निवृत्त मुख्याध्यापक गोपाळ साठे, आई क्रांती साठे, सासू मुख्याध्यापिका पूजादेवी आपटे यांचे प्रोत्साहन लाभले.

गवळी यांचे माध्यमिक शिक्षण बापूसाहेब पाटील हायस्कूलमधून झाले. कमला महाविद्यालयातून त्या बारावी उत्तीर्ण झाल्या. त्यानंतर त्यांनी शासकीय कृषी महाविद्यालयातून पदवी, तर राहुरीतील महात्मा फुले कृषी महाविद्यालयातून पदव्युतर पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. यापूर्वी त्यांची २०२१ ला झालेल्या राज्यसेवा परीक्षेतून सहायक गट विकास अधिकारीपदी निवड झाली. त्या सध्या तुळजापूर पंचायत समितीत सहायक गटविकास अधिकारी पदावर कार्यरत आहेत. त्यांना आई, वडील यांच्यासह पती उपजिल्हाधिकारी सागर नन्नवरे यांचे मार्गदर्शन लाभले.